# मेट्रो ३ : २६७ मीटर भुयार पूर्ण!

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गिकेच्या बांधकामाचे कंत्राट देऊन आता १८ महिने पूर्ण झाले असून या कालावधीमध्ये अनेक महत्वाच्या कामांना गती आली आहे. या मार्गिकेचे सात टप्प्यांमध्ये काम करण्यात येत असून आत्तापर्यंत या संपूर्ण मार्गिकेमध्ये एकूण १ हजार २६७ मीटर लांबीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने देण्यात आली आहे.

मुंबईत विविध ठिकाणी होत असलेल्या भुयारीकरणाच्या कामाकरिता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसी) १७ टनेल बोअरिंग मशिसची (टीबीएम) गरज भासणार असून त्यापैकी ११ मशिन्स शहरात दाखल झाले आहेत. आतापर्यंत ८ मशीन्सद्वारे भुयारीकरणाचे काम करण्यात येत आहे.

आझाद मैदान येथील पॅकेज-२ मध्ये वैतरणा १ आणि २ टीबीएमद्वारे ग्रँट रोड पर्यंत ४.५ किमी भुयारीकरण करण्यात येणार आहे. त्यापैकी ३३० मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे. नयानगर येथे पॅकेज-४ अंतर्गत कृष्णा १ आणि २ या टीबीएमद्वारे दादर मेट्रो स्थानकापर्यंत २.५ किमी भुयारीकरण करण्यात येणार असून त्यापैकी ४९२ मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे. विद्यानगरी येथे पॅकेज- ५ अंतर्गत गोदावरी १ आणि २ या मशिन्सद्वारे आंतरदेशीय विमानतळ स्थानकापर्यंत २.९८ किमी भुयारीकरण करण्यात येणार आहे.



मेट्रो-३ च्या भुयारी मार्गासाठी अशी ११ मशिन्स शहरात दाखल झाली आहेत. ८ मशीन्सद्वारे भुयारीकरणाचे काम करण्यात येत आहे. या मशीन्सना महाराष्ट्रातील सूर्या, वैतरणा, तानसा, क्रिष्णा, गोदावरी, तापी आणि वैनगंगा या नद्यांची नावे देण्यात आलेली आहेत.

नोव्हेंबर २०१७ मध्ये भुयारीकरणास सुरुवात केल्यानंतर आज आम्ही ८ टीबीएमद्वारे १२०० मीटर पेक्षा अधिक भुयारीकरण पूर्ण केले आहे. प्रकल्पाच्या दृष्टीने आम्ही महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे, असे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या. तसेच १४ टीबीएमचे कारखाना स्वीकृती परिक्षण पूर्ण झाले असून प्रकल्पाला आवश्यक असणाऱ्या १७ ही टीबीएम्स जुलैअखेर दाखल होऊन भुयारीकरणास प्रारंभ करणे अपेक्षित आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या.